0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ३०/०३/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा.१९१, दिनांक ३०/०३/२०१२.
३) या कार्यालयाचे पत्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा.१९२, दिनांक ३०/०३/२०१२.
४) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा.१९७, दिनांक ३१/०३/२०१२, ०९/०४/२०१२, १९/०४/२०१२ व २४/०४/२०१२.
५) मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांचे दि.१०/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.
६) मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांचे दि.२३/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.
७) तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. डी.एम. शेडगे यांचे दि.२४/४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.
८) मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी यांचे दिनांक २४/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त झालेले निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा. २५७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक : ३०/०४/२०१२.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २८/०३/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी त्यांचे अधिकारी/कर्मचारी पथक व पंचांसह मे. श्री सप्तश्रृंगी ऑईल कंपनी, ९/१२, चिराग हाऊस, सेक्टर १८, गोकूळ डेअरी जवळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०५ येथे येऊन पोहचले. तेथे उपस्थित असलेले सदर कंपनीचे संबंधित व्यक्ती महेश द्वारकानाथ राठी यांना अधिकाऱ्यांनी त्यांची ओळख सांगून येण्याचे प्रयोजन सांगितले. त्यानुसार कंपनीचे चिराग हाऊस, गाळा क्र. ९/१२ व कंपनीचे वेअर हाऊस प्लॉट नं. ३८ यामधील साठा मोजण्याचे कामकाज चालू केले. सदर ठिकाणी शासन नियंत्रित दराचे पामतेलाचे पॅकिंग होऊन बॉक्स तयार करण्याचे काम होत असल्याचे दिसून आले. अधिकाऱ्यांनी मोजदाद चालू केली असता, दरम्यानच्या काळात कंपनीमध्ये पामतेल साठ्याची आवक होत होती. तसेच तयार

झालेल्या बॉक्सेच वितरणाचे कामही चालू होते. त्यामुळे मोजदाद करण्यामध्ये व्यत्यय येत होता. अधिकाऱ्यांनी महेश द्वारकानाथ राठी यांच्याकडे एस.टी.सी. कंपनी बरोबरच्या करारनाम्याची प्रत मागितली असता, ती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले व इतर आवश्यक कागदपत्रेही सादर करण्यास टाळाटाळ केली. तसेच उपस्थित अधिकाऱ्यांच्या तपासणी कामातही वारंवार हस्तक्षेप करुन शासकीय कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तद्नंतर उपस्थित इसम महेश द्वारकानाथ राठी यांनी अधिकाऱ्यांना गोदामातील पामतेलाच्या साठ्याचे मोजदाद दैनिक रित्या मोजदाद करणारे एस.टी.सी. च्या सर्वेअर मार्फत मोजदाद करण्यात यावी असे सांगितल्याने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष कंपनीत व कंपनीचे वेअरहाऊस यांना पुढील तपासणीच्या अधिन राहून सिलबंद केले.

तसेच दिनांक २८/०३/२०१२ रोजी मे. जयेश ऑईल व मे. नवरंग ऑईल यांच्याही नमूद गोदामास अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष भेट देऊन पामतेलाच्या साठ्याची मोजदाद केली. दिनांक २८/०३/२०१२ रोजी सदर दोन्हीही कंपन्यांचे व्यवहार बंद करण्यात आले होते. तद्नंतर दिनांक २९/०३/२०१२ रोजी सकाळी अधिकाऱ्यांनी पुन्हा सदरच्या दोन्ही गोदामामधील पामतेलाच्या साठ्याची मोजदाद केली असता, दोन्ही कंपन्यातील साठा हा मिळता जुळता आढळल्याने तसेच सदरचा पामतेलाचा साठा हा सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत होणारा अनुदानित साठा असल्याने पर्यायाने पात्र शिधापत्रिकाधारक सदर शिधाजिन्नस पासून वंचित राहू नये, म्हणून अधिकाऱ्यांनी सदरच्या दोन्ही कंपन्याचे व्यवहार पुर्ववत चालू करण्यास परवानगी देण्यात आली.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी दिनांक २९/०३/२०१२ रोजी पंचांसमक्ष ठिक सकाळी १०.०० वाजता मे. श्री सप्तश्रृंगी ऑईल कंपनी, ९/१२, चिराग हाऊस, सेक्टर १८, गोकूळ डेअरी जवळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०५ या कंपनीस पुन्हा भेट दिली व तेथे उपस्थित महेश द्वारकानाथ राठी यांच्या व पंचांसमक्ष सदर कंपनी व वेअरहाऊसचे सिल उघडण्यात आले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष कंपनी व वेअरहाऊसमधील पामतेलाच्या साठ्याची पहाणी करुन मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे व्यवस्थापक महेश राठी यांनी दिलेल्या मान्यतेनुसार मे. सुपरीटेंन्डस कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. या पामतेलाच्या साठ्याचे दैनिकरित्या मोजदाद करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या कंपनीच्या सर्वेअर यांना पाचारण करण्यात आले. तद्नंतर सदर कंपनीचे निरिक्षक श्री. डी.बी. निगोट व सर्वेअर सर्वश्री. भुवेश पाटील व कासम अन्सारी हे गोदामात येऊन पोहचले. त्यांनी कंपनीच्या दोन्ही ठिकाणी असलेल्या पामतेलाच्या साठ्याचे पंच व महेश राठी यांच्या समक्ष मोजदाद करण्यास सुरुवात केली. त्यांनी दोन्ही ठिकाणी प्रत्येक स्टॅग प्रमाणे मोजदाद केली असता, एकूण ७३९२२ पामतेलाचे बॉक्स असल्याचे आढळून आले. त्यानुसार त्यांनी पंचांसमक्ष स्टॅगनुसार अहवालावार स्वाक्षऱ्या करुन तसा अहवाल सादर केला.

अधिकाऱ्यांनी सदर दोन्ही ठिकाणी असलेल्या लोखंडी टाक्यांबाबत उपस्थित इसम महेश राठी यांच्याकडे अधिक विचारणा करुन सदर टाक्यांचे कॅलिब्रेशन सर्टिफिकेट सादर करण्याच्या सुचना दिल्या असता, त्यांनी सदरचे

सर्टिफिकेट त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी दोन्हीं ठिकाणी असलेल्या पामतेलाच्या टाक्यांची पहाणी करुन मोजदाद केली असता, सर्व ठिकाणच्या टाक्यांमधील मिळून एकूण ५० मे. टन पामतेलाचा साठा असल्याचे अधिकाऱ्यांना आढळले. त्यापैकी चिराग हाऊसमधील टाकी क्र. ४ व वेअर हाऊसमधील टाकी क्र. ३, ४ व ५ मध्ये पामतेलाचा साठा निरंक आढळला.

तद्नंतर मे. श्री सप्तश्रृंगी ऑईल कंपनीचे व्यवस्थापक यांनी पंचांसमक्ष उपस्थित अधिकाऱ्यांना मे. सुपरीटेंन्डस कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. या कंपनीत मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन यांना दैनिकरित्या कंपनीत असलेल्या साठ्याची मोजदाद करण्याची कामगिरी सोपवण्यात आल्याचे सांगून सदर कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी/अधिकारी हे रोजच्या रोज कंपनीस भेट देऊन पामतेल बॉक्समधील तसेच टाक्यांमधील सुट्या पामतेलाच्या साठ्याची मोजदाद करीत असल्याचे सांगून तसा दिनांक २८/०३/२०१२ रोजी सकाळी ७.०० वाजता मोजदाद करण्यात आलेल्या साठ्याचा अहवाल पंचांसमक्ष सादर केला. सदरचा दैनक अहवाल हा विहित नमुन्यामध्ये शासनास तसेच इतर संबंधित शासकीय कार्यालयास त्यांच्या कंपनीमधील सुटा व बॉक्समधील साठ्याची स्थिती नियमितपणे कळविण्यात येत असल्याचे सांगितले.

मे. सप्तश्रृंगी कंपनी ही मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन या केंद्रशासनाच्या उपक्रम असलेल्या कंपनीशी करारबध्द असून दोन्ही कंपन्यामध्ये असलेल्या करारनाम्यानुसार सदरच्या दोन्ही गोदामांची प्रामुख्याने फक्त पामतेलाच्या साठवणूकीसाठी परवानगी देण्यात आली आहे. तथापी, पथकाने पंचांसमक्ष गोदामाची तपासणी केली असता, वेअरहाऊसमध्ये पामतेल साठ्याव्यतिरिक्त मोठ्या प्रमाणावर कडधान्याचा साठाही साठवणूक केल्याचे आढळून आले. त्यामुळे एस.टी.सी. सोबतचा कराराचा भंग झाल्याचे अधिकाऱ्यांना आढळून आले.

मे. सप्तश्रृंगी कंपनीस सार्वजनिक वितरण प्रणालीवर गोरगरीब शिधापत्रिकाधारकांना वितरीत होणारा पामतेलाच्या १ लिटर क्षमतेच्या पिशव्या तयार करुन त्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी शासनाकडून सोपविण्यात आलेली आहे. म्हणजेच पामतेलाच्या पिशव्या भरण्याची मशिन तसेच लोखंडी टाक्या यांची कॅलीब्रेशन करुन घेणे गरजेचे आहे. अथवा महाराष्ट्र शासनाच्या वैधमापन शास्त्र या संबंधित विभागाकडून प्रमाणित करुन घेणे, तसे प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे आहे. तथापी, अशाप्रकारच्या लोखंडी टाक्याची कॅलीब्रेशन सर्टिफिकेट तपासणीचे वेळी सादर केली नाही व सदर प्रमाणपत्र त्यांनी संबंधित शासन विभागाकडून उपलब्ध करुन घेतले नसल्याचे सांगितले.

तद्नंतर वरील नमूद टाक्यामधील तसेच बॉक्समधील पामतेलाच्या साठ्याची मोजदाद केल्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष उपस्थित व्यवस्थापक यांना साठापुस्तक सादर करण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार साठा पुस्तकाची अधिकाऱ्यांनी अवलोकन केले असता, त्यामध्ये दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या तपशिल अद्यावत नसल्याचे व निरंक असल्याचे आढळून आले. त्यामुळे अधिकाऱ्यांनी सदर कंपनीत उपलब्ध असलेल्या सुट्या

पामतेलाच्या साठ्यातून पॅकींग करता वापरण्यात आलेला साठा तसेच बॉक्समध्ये उत्पादन झालेला साठा याचा तपशिल उपलब्ध नसल्याने अधिकाऱ्यांनी पंच व उपस्थित व्यवस्थापक यांच्या समक्ष दिनांक २८/०३/२०१२ रोजी सकाळी ७.०० वाजता तयार करण्यात आलेल्या अहवालात अखेर शिल्लक म्हणून दर्शविण्यात आलेल्या ७४.९१० मे. टन सुट्या साठ्यामध्ये दिनांक २८/०३/२०१२ रोजी टँकर क्र. एमएच-०४-ईबी-१०५५, एमएच-०४-ईएल-२५५५ व एमएच-०४-डीके-६२८८ मधून अनुक्रमे २०५७० किलो, १९७९० किलो व १९६०० किलो असे मिळून एकूण ५९९६० किलो म्हणजेच ५९.९६० मे. टन पामतेलाची झालेली आवक जमा करता एकूण १३४.८७० मे. टन पामतेलाचा साठा आढळून आला. तद्नंतर वितरणाचे तपशिल उपलब्ध नसल्याने तपासणीमध्ये सर्व टाक्यांमध्ये मिळून आढळून आलेला ५० मे. टन प्रत्यक्ष शिल्लक साठ्यातून वरील नमूद एकूण १३४.८७० मे. टन हा साठा वजा जाता उर्वरित साठा एकूण ८४.८७० मे. टन हा पामतेलाच्या पिशव्या तयार करण्याकरिता वापरण्यात आल्याचे अधिकाऱ्यांना सकृतदर्शनी दिसून आले. सदर साठ्याचे प्रचलित पध्दतीनुसार अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष बॉक्समध्ये रुपांतरीत केले असता, सदरच्या ८४.८७० मे. टन मधून एकूण ६२१७ बॉक्स (प्रत्येकी १५ लिटर क्षमतेची) पामतेलाचे उत्पादन झाल्याचे निष्पन्न झाले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या दैनिक अहवालामध्ये नमूद ६८२५३ शिल्लक असलेल्या बॉक्समध्ये उत्पादित झालेल्या ६२१७ बॉक्स जमा करता एकूण ७४४७० पामतेलाचे बॉक्सची आकडेवारी पंचांसमक्ष उपस्थित व्यवस्थापकाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. सदरच्या ७४४७० पामतेलाच्या बॉक्सच्या साठ्यामधून व्यवस्थापकाने सादर केलेल्या वितरणाच्या तपशिलानुसार ३४२१ बॉक्स वितरीत झालेला साठा वजा करता उर्वरीत ७१०४९ बॉक्स हे शिल्लक असणे गरजेचे असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. तथापी, वरील नमूद प्रत्यक्षात मोजदाद करण्यात आलेल्या बॉक्सची संख्या ७३९२२ असून त्यामधून ७१०४९ बॉक्स या पुस्तकी शिल्लक असलेला साठा वजा करता एकूण २८७३ पामतेलाचे बॉक्स म्हणजेच ३९.२१ मे. टन पामतेलाचा साठा हा अतिरिक्त आढळून आला. यावरुन अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष उपस्थित व्यवस्थापक महेश द्वारकानाथ राठी यांचा जबाब नोंदविण्याबाबत सुचना दिल्या असता, त्यांनी सदरच्या जबाबावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. सदरच्या आढळून आलेल्या ३९.२१ मे. टन अतिरिक्त साठ्याबाबत व्यवस्थापकास अधिक विचारणा केली असता, ते याबाबत समाधानकारक उत्तर देऊ शकले नाही. तसेच मे. सुपरीटेंन्डस कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. या कंपनीचे पाचारण करण्यात आलेल्या श्री. डी.बी. नोगोट व इतर या अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष साठा मोजदाद केल्याप्रमाणे प्रत्येक पानावर साठवणूक केलेला साठा लिहून त्यांनी तसे प्रमाणित करुन स्वाक्षरी केली. परंतू सदरच्या तपासणीबाबत पंचांसमक्ष नोंदविण्यात आलेल्या जबाबावर त्यांनीही स्वाक्षरी करण्यास नकार देऊन शासकीय कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी यांना सदरचा पॅकींग केलेला पामतेलाचा साठा हा अन्न, नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय यांनी निर्गमित केलेल्या मासिक नियतनानुसार राज्यामधील विविध जिल्ह्यांमधील जिल्हा पुरवठा अधिकारी

यांना वितरीत करावयाची जबाबदारी आहे. परंतू उपरोक्त नमूद अतिरिक्त आढळून आलेला ३९.२१ मे. टन हा साठा संबंधित जिल्ह्यांना नियतनानुसार पूर्णपणे वितरीत न करता सदरचा साठा हा अनधिकृतरित्या स्वत:जवळ बाळगून ठेवल्याने त्यांनी पी.डी.एस. कंट्रोल ऑर्डर, २००१ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग केल्याचे सिध्द झाले आहे.

अशाप्रकारे मे. सप्तश्रृंगी कंपनी यांनी मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन तसेच पर्यायाने शासनाकडून सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत होणारा अनुदानित दराचा पामतेलाचा साठा पॅकिंग करुन वितरणाची जबाबदारी देण्यात आली असता त्यांनी सदरच्या तपासणीमध्ये आढळून आलेले २८७३ पामतेलाचे बॉक्स (३९.२१ मे. टन) या अतिरिक्त पामतेलाचा साठा त्यांनी संबंधित जिल्ह्यांना पूर्णपणे वितरीत न करता तो गैरमार्गाने व काळाबाजारी करण्याच्या उद्देशाने स्वत:जवळ बाळगून ठेवल्याने त्यांनी मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन सोबतच्या करारनाम्याच्या अटींचा भंग करुन शासनाची विश्वासार्हता गमावल्याने तसेच पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० व शासकीय कामकाजात वारंवार अडथळा निर्माण केल्याने भारतीय दंड विधान चे कलम १८६ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. II २७/२०१२ दिनांक २९/०३/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | मे. श्री सप्तश्रृंगी ऑईल कंपनी व वेअरहाऊसमधील तपासणीमध्ये आढळून आलेल्या २८७३ पामतेलाच्या बॉक्सचा अतिरिक्त साठा | २८७३ बॉक्समधील ४३,०९५ पिशव्या | १९,३९,२७५/- |
| | | एकूण | १९,३९,२७५/- |

प्रस्तूत प्रकरणी वाचावे क्र. २ अन्वये उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना पत्र निर्गमित करुन अतिरिक्त आढळून आलेल्या २८७३ बॉक्समधील ३९.२१ मे. टन पामतेलाचा अतिरिक्त साठा हा अलाहिदा करुन प्रस्तूत प्रकरणी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अंतर्गत या कार्यालयास प्राप्त असलेल्या अधिकारान्वये पुढील आदेशापर्यंत संबंधित कंपनीस जतन करुन ठेवण्याच्या सुचना देण्यात याव्यात व उर्वरीत पामतेलाच्या बॉक्समधील साठ्याची शासनाकडून निर्गमित नियतनानुसार संबंधित जिल्ह्यांना पुरवठा पूर्ववत सुरु करण्यात यावा. तसेच कंपनीमध्ये उपलब्ध असलेल्या व पुढील काळात उपलब्ध होण्याऱ्या पामतेलाच्या सुट्या साठ्याची पॅकिंगची प्रक्रिया त्वरीत सुरु करण्याबाबत सुचना देण्यात याव्यात. जेणेकरुन राज्यातील पात्र शिधापत्रिकाधारक पामतेलापासून वंचित राहणार नाहीत, असे कळविण्यात आले आहे.

तसेच वाचावे क्र. ३ अन्वये मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे मालकास पत्र निर्गमित करुन कंपनीमधील अतिरिक्त आढळून आलेला २८७३ बॉक्समधील ३९.२१ मे. टन अतिरिक्त पामतेलाचा साठा अलाहिदा करुन पुढील आदेशापर्यंत जतन करुन ठेवण्यात यावे व कंपनीमधील उर्वरित पामतेलाचा साठा हा नाशवंत असल्याने सदरचा साठा आणखी काही काळ तसाच राहिल्यास खराब होऊन शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने पॅकिंग व नियतनानुसार तात्काळ वितरण करण्याबाबत संबंधित कंपनीस निर्देश देण्यात येऊन सदरच्या कार्यवाहीमध्ये सहकार्य न केल्यास तसेच पामतेलाचा साठा खराब होऊन शासनाचे आर्थिक नुकसान झाल्यास संपूर्ण साठ्याच्या रकमेची जबाबदारी कंपनीवर निश्चित करण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप अंमलबजावणी, मुंबई यांनी त्यांचे वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०४/०४/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०४/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी अथवा आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १७/०४/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १७/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. डी.एम. शेडगे हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे लेखी अभिवेदन पुढील २ दिवसात सादर करणार असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे व्यवस्थापक म्हणून महेश द्वारकानाथ राठी यांनी उपस्थित राहून त्यांचे लेखी निवेदन सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक २४/०४/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २४/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या वतीने प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून महेश द्वारकानाथ राठी हे उपस्थित राहिले व कंपनीचे वाचावे क्र. ८ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. तथापी, त्यांचे टपालामार्फत वाचावे क्र. ७ अन्वये लेखी अभिवेदन प्राप्त झाले. तपासणीच्या वेळी घटनास्थळी ७ पॅकिंग मशिनचे वैधमापन विभागाचे प्रमाणपत्र नसल्याने, मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीस सुनावणीच्यावेळी सादर करण्याबाबत सुचना दिले असता सदरचे पॅकिंग मशिन नविन असल्याने प्रमाणपत्राची गरज नसल्याचे सांगितले. तसेच कंपनीतील अंडरग्राऊंड टाकीचे बिल्डिंग प्लॅनमध्ये उल्लेख आहे किंवा कसे ? याबाबत कंपनीच्या वतीने उपस्थित यांनी तसा उल्लेख नसल्याचे सांगितले. परंतू सदरचे

HEAD OFFIC MUMBAI

प्लॅन सुनावणीस सादर केले नाहीत. मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांनी वाचावे क्र. ६ अन्वये सादर करण्यात आलेल्या पत्रामध्ये त्यांनी त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी केलेल्या विनंतीनुसार पुढील सुनावणी दिनांक २६/०४/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २६/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. कंपनीचे व्यवस्थापक श्री. जयप्रकाश सुर्वे व उपव्यवस्थापक श्री. सुरेश कुमार यांनी उपस्थित राहून त्यांना शाखा व्यवस्थापक यांनी प्राधिकृत केल्याचे प्राधिकारपत्र सादर करुन कंपनीच्या वतीने वाचावे क्र. ५ अन्वये दिलेले निवेदन कायम असल्याचे सांगून गुन्ह्यामधील जप्त असलेले २८७३ पामतेलाचे बॉक्स मुक्त करण्यास विनंती केली. सुनावणीच्या वेळी मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीकडे दिलेल्या मशिनच्या वैधमापन विभागाकडील प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता, याबाबत त्यांना अवगत नसून तसे प्रमाणपत्र त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीमधील स्टोअरेज टँकच्या कॅलिब्रेशन प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता, तेही त्यांच्या कंपनीकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. सदर दोन्ही कॅलिब्रेशन प्रमाणपत्रबाबत मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी बरोबरच्या करारनाम्यात आवश्यक असल्याचे नमूद असल्याबाबत निदर्शनास आणून दिले असता, ही बाब त्यांनी मान्य केली आहे. तसेच दिनांक २४/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीमध्ये मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या वतीने त्यांच्या कंपनीमधील स्टोअरेज टाक्यांचे कॅलिब्रेशन प्रमाणपत्र २८/०३/२०१२ रोजीचे दिनांकित प्रमाणपत्र सादर केल्याबाबत निदर्शनास आणून दिले. म्हणजेच तपासणीपूर्वीच्या मागील सहा महिन्यातील कालावधीमध्ये सदर पॅकिंगची प्रक्रिया विना कॅलिब्रेशन प्रमाणपत्राची झाली असल्याबाबत उपस्थित अधिकाऱ्यांना विचारणा केली असता, याबाबत त्यांना अवगत नसल्याचे सांगून सदर बाबत कंपनीच्या कार्यालयात चौकशी करणार असल्याचे सांगितले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तीवाद :-

दिनांक १७/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या वतीने प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिलेले महेश द्वारकानाथ राठी यांनी कंपनीच्या वतीने सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्यांचा मे. एस.टी.सी. या कंपनी बरोबर पामतेल पॅकेजिंगचा दिनांक ०९/०९/२००९ रोजी करार झाला आहे. सदर करारानुसार मे. एस.टी.सी. या कंपनीकडून प्राप्त झालेल्या पामतेलाच्या साठ्याची एक लिटरच्या पिशव्यांमध्ये पॅकिंग करुन सदर १५ पिशव्यांचा एक बॉक्स वितरणासाठी तयार करण्यात येतो. सदर पामतेलाच्या साठ्याचे अधिकार अथवा धारणाधिकार हा मे. एस.टी.सी. या कंपनीचा असून सदरचा साठा हा सदैव त्यांच्या मालकीचा असल्याचे नमूद केले आहे. करारानुसार सदर साठ्याच्या मोजदाद करण्यासाठी व गुणवत्ता तपासणीसाठी मे. एस.टी.सी. या

कंपनीकडून सर्वेअरची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी सादर केलेला अहवाल हा दोन्ही पक्षकारास अंतीम व बंधनकारक आहे. त्यानुसार मे. एस.टी.सी. या कंपनीने मे. सुपरीटेंन्डस कंपनी ऑफ इंडिया प्रा. लि. या कंपनीची सर्वेअर म्हणून नियुक्ती करुन सदर कंपनीकडून या कामासाठी कंपनीकडून साठ्याच्या मोजदाद करीता श्री. भुयेश पाटील व श्री. एम.डी. फारुख अन्सारी यांची सुपरवायझर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदरचा अहवाल त्यांनी त्यांच्या सुपरीटेंन्डस श्री. डी.बी. निगोट यांना सादर केल्यानंतर तो विविध कार्यालयास सादर करण्यात येत आहे. दिनांक २८/०३/२०१२ रोजी प्राथमिक शिल्लक म्हणून ६८२५३ पामतेलाचे बॉक्स व ७४.९१० मे. टन पामतेलाचा सुटा साठा दिनांक २७/०३/२०१२ अखेरच्या अहवालात कंपनीचे सुपरवायझर यांनी तपासणी करुन सादर केला आहे. तद्नंतर दिनांक २८/०३/२०१२ रोजी ५९.९६० मे. टन पामतेलाच्या साठ्याची आवक मे. एस.टी.सी. या कंपनीकडून प्राप्त झाली. त्यानुसार त्यांनी ११५३२० पामतेलाच्या पिशव्या ७६८८ बॉक्समध्ये पॅकिंग करण्यात आले व त्यापैकी ३४२१ बॉक्स वितरीत केल्यानंतर अखेर शिल्लक म्हणून ७२५२० पामतेलाचे बॉक्स व २९.९२९ मे. टन पामतेलाचा सुटा साठा हा दुपारी ०२.०० वाजेपर्यंत शिल्लक असल्याचे नमूद केले आहे. दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या तपासणीस नियंत्रक शिधावाटप हे सर्वश्री बजाज, शेवाळे व त्यांच्या समवेत असलेल्या २५ कर्मचारी असे पथक पोलिसांसमवेत भेट दिली. तद्नंतर त्यांच्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या बाहेर जाण्यास सांगून त्यांच्या अपरोक्ष पामतेलाच्या साठ्याची मोजदाद केली. तपासणीच्या वेळी कंपनीत स्वतंत्र सर्वेअर असलेल्या कंपनीचे सुपरवायझर श्री. भुयेश पाटील उपस्थित असतानाही त्यांना तपासणीच्या प्रक्रियेमध्ये सामावून घेतले नाही. सायंकाळी त्यांच्या मुख्यत्यारपत्रधारक श्री. द्वारकानाथ राठी तथा त्यांचा मुलगा महेश द्वारकानाथ राठी घटनास्थळी उपस्थित झाल्यानंतर त्यांना कंपनीत मोजदाद करण्यात आलेला साठ्यामध्ये २० मे. टन साठ्याची घट असल्याचे सांगून कंपनी सिल करण्यात येईल असे सांगितले. सदरच्या मोजदादमध्ये टाक्यांमधील साठा हा २० मे. टन कमी आढळून आला. परंतू मोजदादची प्रक्रिया या कामासाठी तज्ञ असलेले निरिक्षक वैधमापन शास्त्र यांच्याकडूनच करुन घेणे आवश्यक आहे. कारण त्यांचे सर्व टाक्यांचे कॅलिब्रेशन झाले असल्याचे नमूद केले आहे. सदरच्या प्रक्रियेमध्ये पामतेलच्या साठ्याचे टाकीनिहाय नमुना घेऊन त्याची घनता तपासल्याशिवाय टाक्यांमधील साठवणूक क्षमताची मोजदाद करणे अशक्य आहे. तद्नंतर श्री. द्वारकानाथ राठी यांनी सदरच्या तपासणी व झडतीच्या प्रक्रियेकरिता प्राधिकृत केलेल्या प्राधिकारपत्राची मागणी करुन तपासणीमध्ये साठा कमी आढळला म्हणून कंपनी सिल करण्याची गरज नसल्याचे नमूद केले आहे. कंपनी सिल केल्यास त्यांच्या व्यवसायावर परिणाम होऊन इतर साठवणूक केलेला मसूर, हिरवे मुग, उडिद या कडधान्यांचा साठ्याच्या वितरणावरही परिणाम होईल, असे नमूद केले आहे. तसेही त्यांनी प्रतिकार केल्यानंतरही प्राधिकारपत्र दाखविल्याशिवाय उपस्थित पथकाने त्यांच्या कंपनीस बाहेरुन सिलबंद केले. तद्नंतर जप्तीचा अहवाल व सुर्पूदनामा त्यांच्या अपरोक्ष तयार करुन तो शटरच्या बाहेरील बाजूस चिटकविण्यात आला. तसेच त्यावर पामतेलाचा साठा, बॉक्स या माहितीचा अंतर्भाव नसल्याने उपस्थित

पथकाने जाणीवपूर्वक या बाबी नमूद केल्या नाहीत. कारण अनावश्यकरित्या, अनधिकृरित्या व अवैधरित्या कंपनीस सिलबंद केले आहे. दिनांक २९/०३/२०१२ रोजी सकाळी १०.०० वाजता पुन्हा तपासणी पथक हे पोलिसांसमवेत उपस्थित राहून कंपनीस सिलमुक्त करुन द्वारकानाथ राठी यांना सदरचा साठा पुन्हा मोजदाद करण्यात येईल असे सांगितले. त्यानुसार त्यांनी सदरची तपासणी मे. एस.टी.सी. यांच्या अधिकाऱ्यांसमक्ष करण्यात यावी अशी विनंती केली असता, पथकाने ती अमान्य केली. द्वारकानाथ राठी यांनी अधिकाऱ्यांना सर्वेअर कंपनीच्या सुपरवायझर यांना साठ्याच्या मोजदादाकरिता परवानगी देण्यात यावी, असे सांगून त्यांनी एम.डी. फारुख्र आणि भुवेश पाटील या सुपरवायझर यांना पाचारण केले. त्यानुसार त्यांनी उपस्थित राहून प्रत्यक्षात साठा मोजदाद करण्यास सुरुवात केली. दरम्यानच्या कालावधीत दुपारी ०२.०० वाजता द्वारकानाथ राठी यांनी डी.बी. निगोट या सर्वेअर कंपनीच्या सुपरीटेंन्डट व वरिष्ठ अधिकारी यांना बोलावून घेतले व तेही हजर झाले. त्यांना असलेल्या माहितीनुसार भुयेश पाटील यांनी उपस्थित पथकास काही साठ्याची दुबार मोजदाद केली असल्याने त्याने पुन्हा एकदा साठ्याची मोजदाद करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली असता, पथकाने सदरची विनंती अमान्य केली याबाबत भुयेश पाटील यांनी उपस्थित वरिष्ठ अधिकारी डी.बी. निगोट यांच्या निदर्शनास आणून दिले असता, निगोट यांनी पथकास पुन्हा फेरमोजणीची विनंती केली. तीही पथकाने अमान्य केली. तद्नंतर डी.बी. निगोट व त्यांचे दोन सुपरवायझर यांनी कंपनीतील साठ्याची पुन्हा मोजदाद करुन दिनांक २९/०३/२०१२ रोजीचा अहवाल तयार करुन तो त्यांच्या मुख्य कार्यालयास सादर केला. उपस्थित पथकाने रात्रौ ११.३० वाजता कंपनीस पुन्हा सिलबंद केले. द्वारकानाथ राठी यांनी उपस्थित पथक व पोलिस अधिकाऱ्यांना वारंवार विनंती करुनही पंचनाम्याची प्रत त्यांना देण्यात आली नाही. महेश द्वारकानाथ राठी यांनी तात्काळ पोलिस ठाण्यास भेट देऊन पंचनाम्याची प्रत मिळण्याबाबत विनंती केली. परंतू पोलिस ठाणे येथेही त्यांना प्रत देण्यात आली नाही. याबाबत त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांना दिनांक २९/०३/२०१२ रोजीच्या पत्रान्वये पंचनाम्याची मागणी केली असता, ती आजमितीस त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली नाही. तसेच दिनांक २९/०३/२०१२ रोजी मोजदाद करण्यासाठी निरिक्षक, वैधमापन शास्त्र विभागाचे अर्हता व तज्ञ असलेल्या अधिकाऱ्यांमार्फत मोजदाद करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण यापूर्वी त्यांनी सदर टाक्यांमधील साठ्याची मोजदाद करुन टाक्यांचे कॅलिब्रेशन केलेले आहे. सदरची तपासणीची प्रक्रिया दुर्भावपूर्ण व अवैधरित्या केवळ त्रास देण्याच्या दृष्टीने करण्यात आली असून त्यांच्यावर लावण्यात आलेले आरोप मान्य नसल्याचे नमूद केले आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २४/०४/२०१२ रोजीच्या अभिवेदनात, त्यांच्या समक्ष डी.बी. निगोट यांनी दिलेल्या जबाबामध्ये घटनास्थळी शिधावाटप विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेले पामतेलाचे मोजमाप हे चुकीचे असून त्यांनी पंचनाम्यावर सह्या केल्या नाहीत. तसेच कंपनीत साठवलेला पामतेलाचा साठा कमी जास्त नसल्याचे सांगून योग्य असल्याचे नमूद केले आहे. मे. एस.टी.सी.

कंपनीचे मार्केटिंग मॅनेजर जयप्रकाश जगन्नाथ सुर्वे यांनी दिलेल्या जबाबामध्ये मे. सप्तश्रृंगी कंपनी यांच्या विरोधात दिनांक २९/०३/२०१२ रोजी २८७३ बॉक्स पामतेलाचा साठा अतिरिक्त असल्याबाबत दिलेली फिर्याद चुकीची असून मे. सप्तश्रृंगी कंपनीने त्यांच्याशी केलेल्या कोणत्याही कराराचा भंग केला नसल्याचे नमूद केले आहे. मे. सप्तश्रृंगी कंपनी कान्फरन्सचे व्यवस्थापक द्वारकानाथ रघुनाथ लाठी यांनी दिलेल्या जबाबात, त्यांच्या कंपनीत येणारे ऑईल हे एस.टी.सी. या विभागाच्या मालकी हक्काचे असून ते ऑर्डरप्रमाणे पॅकिंगचे काम करतात. सदर मालावर त्यांचा कोणताही प्रकारचा हक्क नाही. दिनांक २८/०३/२०१२ रोजी शिधावाटप अधिकारी यांनी छापा टाकला त्यावेळी कोणत्याही प्रकारची सुचना दिलेली नाही व त्यांना कोणत्याही मोजमाप करण्याच्या कामामध्ये घेतलेले नाही. तसेच दिनांक २९/०३/२०१२ रोजी पुन्हा छापा टाकून त्यावेळीही त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती न देता तसेच एस.टी.सी. या कंपनीचे किंवा मार्केटिंग फेडरेशन या विभागाचे कोणही सदस्य नसताना पामतेलाचे माजमाप चुकीचे करुन अतिरिक्त २८७३ बॉक्स आढळला आहे. तपासी पोलिस अधिकारी यांनी यातील जप्त माल हा केंद्र सरकारने आपल्या देशात आयात केलेला असून सदरचा माल ज्या हेतून आयात करण्यात आलेला आहे. तो हेतू साध्य करण्याकरिता व सदरचा माल हा नाशवंत असल्याने शासनाने नियुक्त केलेल्या एस.टी.सी. या संस्थेस देण्यास शिफारस केली आहे.

मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. कंपनीचे दिनांक १०/०४/२०१२ रोजी प्राप्त झालेल्या सादर केलेल्या लेखी निवेदनात, मे. एस.टी.सी. या कंपनीस भारत सरकारने आरबीडी पामोलिन या साठ्याची आयात करुन पॅकिंग व महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरणासाठी त्यांना प्राधिकृत केले आहे. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी, वाशी यांनी त्यांना अवगत केले की, आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २८/०३/२०१२ रोजी दिलेल्या भेटीमध्ये २८७३ बॉक्स अतिरिक्त आढळल्याने सदरचा साठा अलाहिदा ठेवण्याचे सुचना देण्यात आल्या आहेत. त्यांच्या वतीने त्यांनी प्राधिकृत सर्वेअर समवेत साठ्याची केलेल्या प्रत्यक्ष तपासणीमध्ये दिनांक ३१/०३/२०१२ अखेर मोजदाद केली असता, असा कोणताही अतिरिक्त साठा आढळून आला नाही. त्यामुळे सदरचा साठा हा मार्कफेड यांना वितरीत करावयाचा असल्याने व साठा नाशवंत असल्याने त्यांनी योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती करुन तसे नमूद केले आहे.

<u>**निष्कर्ष :**</u>

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २८/०३/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी त्यांचे अधिकारी/कर्मचारी पथक व पंचासह मे. श्री सप्तश्रृंगी ऑईल कंपनी, ९/१२, चिराग हाऊस, सेक्टर १८, गोकूळ

डेअरी जवळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०५ येथे भेट देऊन तपासणी केली असता, तपासणीच्या वेळी दिनांक २८/०३/२०१२ रोजीचे साठापुस्तक अद्यावत नव्हते. तथापी, मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांनी नेमलेल्या मे. सुप्रिटेन्डेन्स कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. या कंपनी मार्फत दैनिकरित्या सुटा व बॉक्समधील पामतेलाच्या साठ्याची मोजदाद करण्याची जबाबदारी असलेल्या कंपनीच्या दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या अहवालानुसार पामतेलाचा सुटा साठा ७४.९१० मे. टन तसेच ६८२५३ पामतेलाचे बॉक्स दिनांक २८/०३/२०१२ रोजी सकाळी शिल्लक असल्याचे आढळ्ले. त्यानुसार सदरहू कंपनीच्या सर्वेअर मार्फत मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी यांच्या नमूद दोन्ही गोदामांवर असलेल्या पामतेलाच्या बॉक्सचे पंचांसमक्ष मोजदाद केली असता, एकूण ७३९२२ पामतेलाचे बॉक्स आढळून आले व तसे उपस्थित सर्वेअर यांनी प्रत्यक्ष मोजदाद करण्यात आलेल्या तपासणी अहवालावर स्वाक्षरीसह प्रमाणित केले आहे. तपासणीच्या वेळी दिनांक २८/०३/२०१२ रोजीचे साठापुस्तक अद्यावत नसल्याने प्राथमिक शिल्लक म्हणून ७४.९१० मे. टन व दिवसभरातील सुट्या पामतेलाची ५९.९६० मे. टन असे मिळून एकूण १३४.८७० मे. टन साठ्यामधून प्रत्यक्षात टाक्यांमधील मोजदाद केलेला ५० मे. टन साठा वजा करुन पामतेल पॅकिंगसाठी वितरणाची आकडेवारी ८४.८७० मे. टन काढण्यात आली. त्यानुसार सदर साठयाचे पामतेलाच्या बॉक्समध्ये रुपांतरीत करुन दिनांक २८/०३/२०१२ नव्याने पॅकिंग केलेल्या बॉक्सची संख्या ६२१७ आढळून आली. दिनांक २८/०३/२०१२ रोजी पामतेलाच्या बॉक्सची प्राथमिक शिल्लक म्हणून दर्शविण्यात आलेली ६८२५३ बॉक्समध्ये दिवसभरातील पॅकिंग झालेल्या ६२१७ बॉक्सची संख्या जमा करुन एकूण ७४४७० पामतेलाच्या बॉक्समधून दिवसभरातील वितरण आदेशानुसार वितरीत झालेला ३४२१ बॉक्सची संख्या वजा जाता ७१०४९ पामतेलाचे बॉक्स शिल्लक असणे अपेक्षित होते. तद्नंतर मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशनच्या सर्वेअर मार्फत प्रत्यक्षात मोजदाद केलेल्या संपूर्ण बॉक्सेसची संख्या ७३९२२ मधून पुस्तकी शिल्लक ७१०४९ बॉक्सचा साठा वजा जाता २८७३ बॉक्स म्हणजेच ३९.२१ मे. टन साठा अतिरिक्त आढळून आल्याने मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी विरुध्द गुन्हा दाखल करुन २८७३ बॉक्स मधील ३९.२१ मे. टन पामतेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीने केलेल्या खुलाशात, त्यांचा मे. एस.टी.सी. या कंपनी बरोबर झालेल्या पामतेल पॅकेजिंगच्या करारानुसार मे. एस.टी.सी. या कंपनीकडून प्राप्त झालेल्या पामतेलाच्या सुटा साठ्याची एक लिटरच्या पिशव्यांमध्ये पॅकिंग करुन १५ पिशव्यांचा एक बॉक्स वितरणासाठी तयार करण्यात येवून सदर बॉक्सचे वितरण महाराष्ट्र शासनाकडून निर्गमित नियतनानुसार संबंधित जिल्हयांना वितरीत करावयाची जबाबदारी आहे. करारानुसार सदर साठ्याच्या मोजदाद करण्यासाठी व गुणवत्ता तपासणीसाठी मे. एस.टी.सी. या कंपनीकडून सर्वेअर म्हणून मे. सुपरीटेंन्डस कंपनी ऑफ इंडिया प्रा. लि. या कंपनीची नियुक्ती करण्यात आली असून सदर कंपनीकडून साठ्याच्या मोजदाद करीता श्री. भुयेश पाटील व श्री. एम.डी. फारुख अन्सारी यांची सुपरवायझर म्हणून नियुक्ती करण्यात आली असुन त्यांनी सादर केलेला अहवाल हा दोन्ही पक्षकारास अंतीम व बंधनकारक

असल्याचे सांगितले आहे. दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या तपासणीस आलेल्या पथकाने कंपनीच्या कर्मचाऱ्यांना कंपनीच्या बाहेर जाण्यास सांगून त्यांच्या अपरोक्ष पामतेलाच्या साठ्याची मोजदाद केली असल्याचे सांगितले. कंपनीमधील सर्व टाक्यांचे कॅलिब्रेशन निरिक्षक वैधमापन शास्त्र यांच्याकडूनच झाले असल्याचे सांगुन मोजदादची प्रक्रियेमध्ये ते तज्ञ असल्याने त्यांच्या कडूनच मोजदाद करुन घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. दिनांक २९/०३/२०१२ रोजी पथकाने द्वारकानाथ राठी यांना सदरचा साठा पुन्हा मोजदाद करण्यात येईल असे सांगितल्याने त्यांनी अधिकाऱ्यांना सर्वेअर कंपनीच्या सुपरवायझर यांना साठ्याच्या मोजदादाकरिता परवानगी देण्यात यावी, असे सांगून एम.डी. फारुख आणि भुवेश पाटील या सुपरवायझर व डी.बी. निगोट या सर्वेअर कंपनीच्या सुपरीटेंन्डट व वरिष्ठ अधिकारी यांना पाचारण केले. त्यानुसार त्यांनी उपस्थित राहून प्रत्यक्षात साठयाची मोजदाद केली. तसेच दिनांक २९/०३/२०१२ रोजी मोजदाद करण्यासाठी निरिक्षक, वैधमापन शास्त्र या विभागाचे अर्हता व तज्ञ असलेल्या अधिकाऱ्यांमार्फत मोजदाद करुन घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

तथापी, मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या वतीने सादर केलेले उपरोक्त निवेदन पहाता ते मोघम स्वरुपाचे असुन दिशाभुल करणारे आहे. दिनांक २८/०३/२०१२ व २९/०३/२०१२ या दोन्ही दिवशी तपासणीच्या वेळी मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या वतीने उपस्थित द्वारकानाथ राठी व महेश राठी यांनी तपासणीच्या कामात वारंवार हस्तक्षेप करुन पर्यायाने शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या खुलाशात त्यांनी केलेल्या विनंतीनुसार उपस्थित पथकाने मे. एस.टी.सी. या कंपनीच्या वतीने साठ्याची मोजदाद करण्याकरिता नेमणूक करण्यात आलेल्या अधिकृत सर्वेअर्सना पंचासमक्ष पाचारण करण्यात आले व सदर सर्वेअर्सनी मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी व वेअरहाऊसमधील पामतेलाच्या साठ्याची उपस्थित अधिकारी, पंच तसेच द्वारकानाथ राठी व महेश राठी यांचेसमक्ष प्रत्यक्ष साठ्याची मोजदाद करुन एकुण ७३९२२ पामतेलाचे बॉक्स असल्याचे सांगुन त्यांनी स्टॅगनिहाय नमूद केलेल्या आकडेवारीच्या अहवालावर स्वत:च्या स्वाक्षरीसह प्रमाणित केले आहे. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे उपस्थित प्रतिनिधी यांना तपासणीच्या वेळी मे. एसटीसी कंपनी ही भारत सरकारच्या अंगिकृत उपक्रम असलेल्या कंपनीकडुन महाराष्ट्र शासन, सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत करावयाचा पामतेलाचा अनुदानीत साठा प्राप्त करुन घेत असल्याचे आढळून आले आहे. सदर पामतेलाच्या साठयाची पॅकींगची प्रक्रिया मे. श्री सप्तश्रृंगी या कंपनीत होत असल्याने सदरहु वितरणामध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने तपासणी करण्यात येत असल्याचे उपस्थित पथकाने सांगितले. तथापी, शासनाच्या वतीने करण्यात येणाऱ्या तपासणीमध्ये उपस्थित पथकास मे. श्री सप्तश्रृंगी या कंपनीच्या प्रतिनिधींनी त्यांच्या अधिकाराबाबत वारंवार विचारणा करुन जाणुनबुजुन शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला, ही गंभीर बाब आहे. मे. श्री सप्तश्रृंगी या कंपनीच्या वतीने सादर केलेल्या लेखी निवेदनासोबत त्यांनी कंपनीमध्ये ९ टाक्यांचे साठवणूक क्षमता दर्शविणारे वैधमापन शास्त्र विभागाचे दिनांक २८/०३/२०१२ रोजी

निर्गमित केलेल्या पडताळणी प्रमाणपत्र क्र. २७५८२६ सादर केले आहे. तथापी, घटनास्थळी दिनांक २८/०३/२०१२ रोजी मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या प्रतिनिधींनी सदर टाक्यांचे कॅलिब्रेशन नसल्याचे कबूल केले होते. सदर प्रमाणपत्राचे अवलोकन करता दि.२८/०३/२०१२ या दिवशी तपासणीकरुन त्याबाबतचे शुल्काची रक्कम स्विकारुन त्याच दिवशी प्रमाणपत्र निर्गमित केल्याचे आढळून आल्याने या कार्यालयाकडून दि.२५/०४/२०१२ रोजी नियंत्रक वैधमापन शास्त्र यांना निर्गमित केलेल्या पत्रान्वये सदर प्रमाणपत्राची सत्यता पडताळून तसेच मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीने यापूर्वीच्या कालावधीत कॅलीब्रेशन प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेतल्याने सदर बाबत त्यांच्या स्तरावरुन दि लीगल मेट्रोलॉजी (पॅकेज कमोडिटीज) रुल्स, २०११ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द योग्य ती पुढील कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचा मे. एसटीसी या कंपनीसोबत झालेल्या करारनाम्यातील “सप्तश्रृंगीच्या जबाबदाऱ्यांमध्ये नमुद अट क्र. I (आय) मध्ये मे. एसटीसी या कंपनीकडून पुरविण्यात येणारा पामतेलाचा सुटा साठा हा स्वच्छ कॅलिब्रेशन केलेल्या टाक्यांमध्येच साठवणूक करणे आवश्यक असल्याचे नमुद आहे.” म्हणजेच दिनांक २८/०३/२०१२ पूर्वीच्या कालावधीत सदर कंपनीत होत असलेल्या पॅकिंगची प्रक्रिया ही विना कॅलिब्रेशन सर्टिफिकेटची झाली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. त्यामुळे यापुर्विच्या कालावधीत होत असलेल्या पामतेलाच्या पॅकींगमध्ये प्रत्यक्षात विहीत परिमाणापेक्षा कमी क्षमतेची पॅकिंग झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीने द्विपक्ष कराराचे भंग केल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळेच तपासणीच्या वेळी एकुण २८७३ पामतेलाचे बॉक्स मधील ३९.२१ मे. टन साठा हा उपस्थित पथकास अतिरीक्त आढळून आल्याचे निष्पन्न झाले आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २४/०४/२०१२ रोजीच्या अभिवेदनात, त्यांनी या महत्वाच्या गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या २८७३ बॉक्स मधील ३९.२१ मेट्रिक टन अतिरीक्त आढळून आलेल्या पामतेलाच्या अनुदानीत साठयाबाबत पुढील सखोल तपास करणे अपेक्षीत होते. तथापी, त्यांनी मे. एस.टी.सी. या कंपनीचे अधिकारी, मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे द्वारकानाथ रघुनाथ राठी व सर्व्हेअर कंपनीचे अधिकारी डी. बी. निगोट यांनी दिलेले जबाब नोंदवून सोपस्कार पूर्ण केल्याचे दिसुन येत आहे. वास्तविक पहाता मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे द्वारकानाथ रघुनाथ राठी व सर्व्हेअर कंपनीचे अधिकारी डी. बी. निगोट या दोन्ही इसमांनी तपासणीचे दिवशी घटनास्थळी घडलेल्या घटनाक्रमानुसार पंचांसमक्ष नोंदविण्यात आलेल्या जबाबावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला होता ही बाब नमुद करावीशी वाटते.

मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीच्या विनंती नुसार नैसर्गिक न्याय म्हणून त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी देण्यात आली. कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात त्यांच्या कंपनीस भारत सरकारने आरबीडी पामोलिन या साठ्याची आयात करुन पॅकिंग व महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरणासाठी त्यांना प्राधिकृत केल्याचे सांगुन त्यांच्या अधिकाऱ्यांनी मे. श्री सप्तश्रृंगी

कंपनी, वाशी या कंपनीस दिलेल्या भेटीमध्ये त्यांच्या वतीने त्यांनी प्राधिकृत सर्वेअर समवेत साठ्याची दिनांक ३१/०३/२०१२ अखेर मोजदाद केली असता, असा कोणताही अतिरिक्त साठा आढळून आला नाही असे सांगितले.

तथापी, शासनाच्या वतीने दिनांक २८/०३/२०१२ व २९/०३/२०१२ या दोन्ही दिवशी करण्यात आलेल्या तपासणीचे वेळी मे. एसटीसी या कंपनीच्या अधिकाऱ्यांना तपासणी बाबत माहित असुन सुध्दा कंपनीचे वतीने कोणीही अधिकारी घटनास्थळी उपस्थित राहीले नाहीत ही बाब संभ्रम: निर्माण करणारी आहे. वास्तविक पहाता सदरच्या कारवाईच्या वेळी अथवा कारवाईनंतर मे. एसटीसी या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी या कार्यालयास संपर्क साधणे अपेक्षित होते. परंतु त्यांनी तसे न करता परस्पर मे. श्री सप्तश्रृंगी या कंपनीस व ए पी एम सी पोलीस ठाणे येथे भेट दिली आहे. कंपनीत दिलेल्या भेटीमध्ये दिनांक ३१/०३/२०१२ अखेर म्हणजेच या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या तपासणीच्या दोन दिवसानंतर त्यांच्या प्राधिकृत सर्वेअर समवेत साठयाची मोजदाद करुन कोणताही अतिरीक्त साठा आढळून आला नाही असे सांगितले. मे. एसटीसी कॉर्पोरेशन ऑफ इंडीया लि. या भारत सरकारच्या अंगिकृत उपक्रम असलेल्या कंपनीकडुन शासनाच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाईचे समर्थन करणे अपेक्षीत होते. तथापी, त्यांनी दि.०५/०४/२०१२ रोजी या कार्यालयास सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये पामतेलाच्या २८७३ बॉक्स अतिरीक्त नसल्याचे नमुद केल्याने या कार्यालयाच्या न्यायीकवत अधिकार (Quasi judicial process) मध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला आढळून आले आहे. सदर बाब ही अत्यंत खेदजनक आहे. वास्तविक पाहता मे. एसटीसी कॉर्पोरेशन ऑफ इंडीया लि. या कंपनीच्या मुंबई विभागातील अधिकाऱ्यांकडून मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीस नियमित भेट देऊन तपासणी करणे आवश्यक असताना त्यांनी मे. सुपरीटेंन्डस कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. या खाजगी कंपनीकडे जबाबदारी सोपवून सदर कंपनीने सादर केलेल्या दैनिक मोजदाद अहवालावर ते अवलंबुन असल्याचे दिसून येत असल्याने वरील सर्व प्रकरणात मे. एसटीसी या भारत सरकारच्या अंगिकृत उपक्रमाकडून अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे आढळते. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीस द्विपक्ष करारानुसार पामतेलाच्या पिशव्या भरण्याची मशिन तसेच लोखंडी टाक्या यांची कॅलीब्रेशन करुन घेणे गरजेचे आहे. तथापी, तपासणीच्या दिवसापर्यंत मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या वैधमापन शास्त्र या संबंधित विभागाकडील प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेतले नाही, या महत्वाच्या बाबी मे एसटीसी या कंपनीच्या अधिकाऱ्यांना अवगत असून सुध्दा त्यांनी जाणीवपुर्वक डोळेझाकपणा करुन त्यांना नेमुन दिलेल्या कर्तव्यात कसुर केल्याचे दिसून येत आहे. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीने करारनाम्यातील अटींचा भंग केल्यावरुन शासनाची विश्वासार्हता गमावल्याचे निष्पन्न झाले असतांनाही मे. एसटीसी या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्यांचे स्तरावर सदर कंपनीविरुध्द कारवाई प्रस्तावित न करता या विभागाकडून जप्त करण्यात आलेल्या पामतेलाच्या अतिरीक्त साठयाची या कार्यालयाकडे वारंवार मागणी करणे ही आश्चर्यजनक बाब आहे. प्रस्तुत प्रकरणी, मे. एसटीसी या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना केंद्र शासनाकडून सोपविण्यात आलेल्या जबाबदारीचे हेतुपुरस्सर टाळाटाळ करुन पॅकर्स म्हणून मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे खुलेआम समर्थन करीत असल्याचे

HEAD OFFICE
MUMBAI

दिसुन येत असल्याने त्यांच्या या बेजबाबदार वागणुकीमुळे या प्रकरणी त्यांचा प्रत्यक्ष सहभाग असल्याचे नमुद करावेसे वाटते.

मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी या कंपनीस मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन तसेच पर्यायाने शासनाकडून सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत होणारा अनुदानित दराचा पामतेलाचा साठा पॅकिंग करुन वितरणाची जबाबदारी देण्यात आली असता त्यांनी सदरच्या तपासणीमध्ये आढळून आलेले २८७३ पामतेलाचे बॉक्स (३९.२१ मे. टन) या अतिरिक्त पामतेलाचा साठा त्यांनी संबंधित जिल्ह्यांना विहीत परिमाणामध्ये पूर्णपणे वितरीत न करता तो गैरमार्गाने व काळाबाजारी करण्याच्या उद्देशाने स्वत:जवळ बाळगून ठेवल्याने त्यांनी मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन सोबतच्या करारनाम्याच्या अटींचा भंग करुन शासनाची विश्वासार्हता गमावल्याने पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. सबब, नमुद गुन्हयामधील अतिरीक्त आढळून आलेल्या २८७३ बॉक्स मधील ३९.२१ मे.टन पामतेलाचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६- अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. II २७/२०१२ दिनांक २९/०३/२०१२ अन्वये गुन्हा नोंद मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश :-</u>

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या २८७३ बॉक्समधील ३९.२१ मे. टन पामतेलाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेला अनुदानीत दराचा पामतेलाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) उपरोक्त कार्यवाही करतांना उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांनी उपरोक्त पामतेलाचा साठा संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांच्या पुढील महिन्याच्या नियतनामध्ये दर्शविण्यात यावा.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

0016
Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे मालक
२) मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे व्यवस्थापक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच जप्त मुद्देमाल हा नाशवंत असल्याने सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांना माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) कार्यासन अधिकारी, मागणी शाखा, का.क्र. २, प्रधान कार्यालय यांना माहिती व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
६) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.